# मराठी भाषा संवर्धन कार्यक्रमाचा अहवाल

**या तंत्रज्ञानाच्या युगात संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषेचे वैभव जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.**

ओरिएन्टल शिक्षण संस्थेच्या, सानपाडा वाणिज्य आणि तंत्रज्ञान महाविद्यालयात करिअर कट्टा २०२१- २०२२ अंतर्गत विद्यार्थ्यांची मराठी शब्दसंपदा वाढविण्यासाठी आणि त्यांना मराठी संस्कृती आणि इतिहासाची ओळख करून देण्यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. १८ जानेवारी २०२२ रोजी करिअर कट्टा टीमने विद्यार्थ्यांना संगणकीय ग्रंथालयाचे संकेतस्थळ उपलब्ध करुन दिले.

## ***"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"***

तारखेचे व उपक्रमांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे:— वेळ: दुपारी १२:०० वाजता

| तारीख | उपक्रम |
|---|---|
| १९/०१/२०२२ | एकपात्री अभिनय स्पर्धा |
| २०/०१/२०२२ | कथा लेखन, निबंध लेखन व कथाकथन |
| २१/०१/२०२२ | काव्यवाचन, काव्यलेखन, चारोळी लेखन. |
| २२/०१/२०२२ | व्याख्यान (प्रेरणादायक मार्गदर्शन) |
| २४/०१/२०२२ | प्रश्न मंजुषा |

*१९ जानेवारी २०२२*

१९ जानेवारी २०२२ रोजी दुपारी १२ वाजता **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** ह्या कार्यक्रमाचे आभासी उद्घाटन प्राचार्य प्रो. रावसाहेब शिंदिगळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. प्रा.विद्युला कुलकर्णी (अध्यक्ष - व्यक्ती) यांच्या औपचारिक स्वागत परिचयाने कार्यक्रमाची सुरुवात झाली व त्यांनी कार्यक्रमाची रुपरेषा आणि विविध स्पर्धांचे उद्दिष्ट सांगितले. प्रा.शीला वारभुवन (उपप्राचार्य) यांनी श्रोत्यांना संबोधित करून मराठी भाषेचा इतिहास व महत्त्व विशद केले. प्रा. अभिजित पवार यांनी **"एकपात्री अभिनय स्पर्धा"** चे सूत्रसंचालन केले. विविध विभागातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. कु. दिव्या पाटील (टीवायबीएमएमसी) ह्या विद्यार्थीनीने एकपात्री अभिनय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला आणि कु. रूपाली मोहिते (एसवायबीएमएमसी) ह्या विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. प्रा.तेजल धर्मासी यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.


Career Katta is presenting
एक निष्ठा, एक आशा,
एक रंगी रंग दे
Career Katta
27 others
12:17 PM


मराठी भाषा
संवर्धन पंधरवडा


Roseline Linita
Divya Patil
POOJA GUDEKAR
36. Ritu Tandel
Rajashree Jadhav
25. SAKSHI PATIL
Zufia Khan
11 others
12:23 PM
Marathi Bhasha Diwas


माणसाने माणसाशी
माणसासम वागणे





*२० जानेवारी २०२२*

२० जानेवारी २०२२ रोजी आभासी कथालेखन, निबंध लेखन आणि कथाकथन या कार्यक्रमांचे आयोजन केले होते . विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी प्रा.विदुला कुलकर्णी व प्रा. तेजल धर्मासी यांनीही कथा सादर केल्या. कु. आरती बांगर (एस.वाय.बी.बी.आय.) ह्या विद्यार्थीनीने कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. कु.स्वप्नाली गाडगे (टी.वाय.बी.एससी.सी.एस) ह्या विद्यार्थीनीने निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक, कु.निकिता गायकवाड (एस.वाय.बी.बी.आय.) आणि कु.रेश्मा पाटील (एफ.वाय.बी.एससी.आय.टी.) ह्या विद्यार्थीनींनी निबंध लेखन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला, कु. मिसबा शेख (टी.वाय.बॅफ) ह्या विद्यार्थीनीने निबंध लेखन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

Roll.


REC
Quadir Hussain
Aarti Bargar
34. PRERNA RAWALE
44 Archana Katade
Ivy Ganguly
12:40 PM | cpy-ogue-yeg


REC
Aarti Bargar
12:37 PM | cpy-ogue-yeg


Ivy Ganguly
12:44 PM
Type here to search

२१ जानेवारी २०२२

२१ जानेवारी २०२२ रोजी आभासी काव्य वाचन, काव्य लेखन, चारोळी लेखन या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रा.विदुला कुलकर्णी, प्रा. तेजल धर्मासी, प्रा.सुशील जाधव, प्रा. अभिजीत पवार, प्रा. आकांक्षा शिरगावकर यांनीही कविता सादर केल्या. कु. दिशा गॉल (टी.वाय.बी.एससी.सी.एस) ह्या विद्यार्थीनीने काव्य लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, कु. आरती बांगर (एस.वाय.बी.बी.आय.) आणि कु. प्रीती कुटे (एस.वाय.बी.बी.आय.) ह्या विद्यार्थीनींने द्वितीय क्रमांक, कु. मृणालिनी जाधव (एफ.वाय.बीकॉम) आणि कु. रेश्मा पाटील (एफ.वाय.बी.एससी.आय.टी.) यांनी काव्य लेखन स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला तसेच कु. मिसबाह शेख (टी.वाय.बॅफ) ह्या विद्यार्थीनीने काव्य वाचन मध्ये प्रथम क्रमांक पटकावला. कु. अर्चना काकडे (एफ.वाय.बीकॉम) ने द्वितीय क्रमांक पटकावला तर कु. आरती बांगर (एस.वाय.बी.बी.आय.) ह्या विद्यार्थीनीने काव्य वाचन मध्ये तृतीय क्रमांक मिळविला.






Aarti Bangar
RESHMA PATIL


ANIKET AWALE
Aarti Bangar
44 Archana Kakade
RESHMA PATIL


Aarti Bangar
44 Archana Kakade
RESHMA PATIL







**२२ जानेवारी २०२२**

२२ जानेवारी २०२२ रोजी श्री. सुकृत भूषण यांचे आभासी व्याख्यान आयोजित केले होते. श्री. सुकृत भूषण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तरुणांमध्ये क्रांती घडवून आणून त्यांनी अधिकाधिक सरकारी नोकऱ्या संदर्भात माहिती देणे व आपल्या भावी भारताच्या कामकाजात नवीन बदल घडवून आणणे त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांना नोकरीच्या विविध पर्यायांची माहिती व्हावी, हा या सत्राचा उद्देश होता. अतिथी वक्त्याने विद्यार्थ्यांना सरकारी नोकरीच्या संधी व त्यासाठी लागणारे प्रयत्न यासंदर्भात विद्यार्थ्यांना यथार्थ माहिती दिली.











*२४ जानेवारी २०२२*

२४ जानेवारी २०२२ रोजी आभासी "प्रश्न मंजुषा" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रश्न मंजुषा स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. अभिजित पवार यांनी केले. विजेत्यांच्या घोषणेने सत्राचा समारोप झाला. कु. रितू तांडेल (एस.वाय.बी.बी.आय.) ह्या विद्यार्थींनीने "प्रश्न मंजुषा" स्पर्धेत प्रथम क्रमांक व कु. दिशा गॉल (बीएससी सी एस) ह्या विद्यार्थीनीने "प्रश्न मंजुषा" स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. भाषेचे सामर्थ्य आणि त्याचा व्यक्तीच्या जीवनावर होणारा परिणाम या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना भाषेच्या इतिहासाची जाणीव झाली आणि विद्यार्थ्यांना राजभाषा शिकण्यास प्रोत्साहन मिळाले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोप प्रा.विदुला कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शनाने केला.


ही मायभूमी, ही जन्मभूमी,
ही कर्मभूमी अमुची...
Aditya Creations








3/2/2022

प्रा.विदुला कुलकर्णी
करिअर मार्गदर्शन केंद्र (करिअर कट्टा)

ok

3/2/22

प्राचार्य

Sanpada College of Commerce & Technology
Sanpada Navi Mumbai 400 705